# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/०६/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई
## कल्टीवेटर चोरी करणारा आरोपी जेरबंद

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत मौजा नगरधन १० किमी दक्षिण येथे दिनांक २०/०६/२०२२ चे दुपारी १२.०० वा ते १२.१५ वा दरम्यान फिर्यादी नामे शशिकांत विठोबा गायधने ५२ वर्ष रा. नगरधन यांनी त्यांचा कल्टीवेटर` आपल्या बहिनीचे घरी ठेवला होता. यातील अनोळखी आरोपीने फिर्यादीचे भाचीस विश्वासात घेवुन लबाडीने सदर कल्टीवेटर घेवुन गेल्याने पो स्टे रामटेक येथे अप क्र ३५०/२२ कलम ४०६ भादवि चा गुन्हा नोंद करून तपासात होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना दि २२.०६.२२ रोजी मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून चाचेर येथे राहणारा आरोपी नामे— संदीप शंकर वाघमारे वय ३० वर्ष, रा. चाचेर यास ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्याने त्याचा लाल रंगाचा सोनालिका कपंनीचा विना नंबरचा ट्रॅक्टर वापरून लबाडीने फिर्यादीचा कल्टीवेटर घेवुन गेल्याचे सांगितल्याने त्याचा लाल ट्रॅक्टर कि. २,३०,०००/—रू. व कल्टीवेटर कि २०,०००/—रू. असा एकुण २,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे रामटेक चे ताब्यात दिले.

सदरची कारवाई  नागपुर ग्रामीण चे पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे आदेशाने स्थानीक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली सफौ/चंद्रशेखर गडेकर पोना अमोल वाघ, रोहन डाखोरे, चालक अमोल कुथे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथकान केली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर